**महाराष्ट्र जनशक्ती** | ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : १६१ वे | दिनांक : ०६/०६/२०२६ | वार : शनिवार

## MPSC उमेदवारांसाठी 'निपूण सेतू'ची मोठी संधी

**मुंबई :** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने (एमपीएससी) केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या (यूपीएससी) प्रतिभा सेतूच्या धर्तीवर निपूण सेतू उपक्रम सुरू केला आहे. या उपक्रमामुळे अंतिम निवड यादीत शिफारस न झालेल्या उमेदवारांना सेवेची संधी मिळणार आहे. यासंबंधीचा शासन निर्णय आज जारी झाला.

शासन निर्णयानुसार, महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत दरवर्षी विविध स्पर्धा परीक्षा घेण्यात येतात. सदर परीक्षांमध्ये मोठ्या संख्येने उमेदवार पात्र ठरत असले तरी उपलब्ध पदसंख्या मर्यादित असल्यामुळे अंतिम निवडीसाठी केवळ काही उमेदवारांचीच शिफारस केली जाते. परिणामी, अनेक गुणवंत व सक्षम उमेदवारांकडे आवश्यक शैक्षणिक पात्रता, स्पर्धात्मक परीक्षांमधून विकसित झालेली विश्लेषणक्षमता, नेतृत्वगुण तसेच सार्वजनिक सेवा करण्याची मानसिकता असूनदेखील त्यांना अपेक्षित रोजगाराच्या संधी उपलब्ध होत नाहीत. केंद्रीय लोकसेवा आयोगाने (UPSC) मुलाखत फेरीपर्यंत पात्र ठरलेल्या परंतु अंतिम गुणवत्ता यादीत स्थान न मिळालेल्या उमेदवारांसाठी “प्रतिभा सेतू” पोर्टल विकसित केले आहे.

याच धर्तीवर महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (MPSC) विविध परीक्षांच्या अंतिम टप्प्यापर्यंत (मुलाखत / कौशल्य चाचणी) पोहोचूनही अंतिम निवड यादीत स्थान मिळवू न शकलेल्या राज्यातील गुणवंत उमेदवारांच्या ज्ञानाचा आणि कौशल्याचा लाभ राज्याच्या आर्थिक व औद्योगिक विकासासाठी करून घेणे आवश्यक आहे. या दृष्टीने उमेदवारांचे तपशील सार्वजनिक तसेच विशेषतः महाराष्ट्रातील खाजगी क्षेत्रातील संभाव्य नियोक्त्यांना आणि उद्योजकांना एकाच व्यासपीठावर उपलब्ध करून देण्यासाठी, उद्योग विभागामार्फत विकसित केलेल्या एक खिडकी 'मैत्री २.०' (MAITRI २.०) पोर्टल अंतर्गत "निपुण सेतू" हा महत्त्वाकांक्षी उपक्रम सुरू करण्याचे शासनाच्या विचाराधीन होते. या अनुषंगाने मंत्रिमंडळाने १३ एप्रिल २०२६ रोजीच्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार शासनाने ‘निपूण सेतू’ हा उपक्रम सुरू केला आहे, असे आज जारी झालेल्या शासन निर्णयात नमूद करण्यात आले आहे.

अ) उपक्रमाची व्याप्ती व उमेदवारांची पात्रता निकष: १. पात्रता: हा उपक्रम महाराष्ट्र लोकसेवा आयोगा (MPSC) मार्फत घेतल्या जाणाऱ्या कोणत्याही परीक्षेच्या अंतिम टप्प्यापर्यंत (मुलाखत फेरी / कौशल्य चाचणी / शारीरिक चाचणी, जी लागू असेल ती) पोहोचलेल्या, परंतु अंतिम गुणवत्ता यादीत स्थान न मिळालेल्या सर्व उमेदवारांसाठी लागू राहील.

२. कालावधी व अंमलबजावणी: हा उपक्रम सदर शासन निर्णय निर्गमित झालेल्या दिनांकापासून महाराष्ट्र लोकसेवा आयोगाद्वारे पुढे आयोजित होणाऱ्या सर्व परीक्षांसाठी अनिवार्यपणे लागू राहील. ३. भूतलक्षी तरतूद (Retrospective Provision): मागील एका वर्षात झालेल्या परीक्षांच्या अंतिम टप्प्यातील उमेदवारांकडून महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत संमती पत्र प्राप्त झाल्यास आणि महाराष्ट्र लोकसेवा आयोगाला तांत्रिकदृष्ट्या शक्य असल्यास, अशा उमेदवारांची माहिती देखील या पोर्टलवर समाविष्ट करण्यात येईल.

ब) पोर्टलवर उपलब्ध करावयाची उमेदवारांची माहिती (Data Fields): महाराष्ट्रातील खाजगी उद्योजक, कॉर्पोरेट्स आणि सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांना योग्य मनुष्यबळ निवडता यावे यासाठी उमेदवारांचे खालील तपशील पोर्टलवर उपलब्ध राहतील. १. उमेदवाराचे पूर्ण नाव आणि जन्मवर्ष. २. शैक्षणिक पात्रता (पदवी, पदव्युत्तर पदवी, विशेष प्राविण्य). ३. पूर्व कामाचा अनुभव (असल्यास) ४. संबंधित परीक्षेचे नाव आणि अंतिम टप्यात (मुलाखत / कौशल्य चाचणी) मिळालेले गुण. ५. उमेदवाराचा संपर्क तपशील (ईमेल आणि मोबाईल क्रमांक - केवळ अधिकृत नियोक्त्यांनाच दृश्यमान).

(क) डेटा गोळा करण्याची व प्रदर्शित करण्याची कार्यपद्धती: १. स्वयंचलित डेटा स्थलांतर (API Integration): महाराष्ट्र लोकसेवा आयोग (MPSC) प्रत्येक परीक्षेचा अंतिम निकाल जाहीर झाल्यानंतर, अंतिम टप्प्यापर्यंत पोहोचलेल्या, तथापि अंतिम निवडयादीत समाविष्ट न झालेल्या उमेदवारांचा वरील डेटा निपुण' पोर्टलवर दरवर्षी आपोआप API (Application Programming Interface) द्वारे सुरक्षितपणे स्थलांतरित करेल.

२. डेटा दृश्यमानतेचा कालावधी (Data Visibility): उमेदवाराचा डेटा आयोगाच्या अन्य परिक्षेत त्याची निवड होईपर्यंत निपुण पोर्टलवर संभाव्य नियोक्त्यांसाठी दृश्यमान राहील. त्यानंतर हा डेटा निपुण पोर्टलद्वारे आपोआप वगळला जाईल.

ड) उमेदवारांची संमती आणि माहितीची गोपनीयता (Data Privacy & Consent): १. अनिवार्य संमती (Consent):


अ) महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येणा-या परिक्षेचे फॉर्म भरताना त्यांचा डेटा परिक्षा अंतिम निकालानंतर निपुण सेतु पोर्टलवर प्रकटन करण्याबाबत संमती (Digital Opt-in Consent) घेण्यात येईल.

आ) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून प्राप्त झालेले उमेदवारांचे तपशील नियोक्त्यांना त्यांनी दर्शविलेल्या आवश्यक अर्हतेनुसार निपुण सेतु मार्फत उपलब्ध करुन देण्यात येतील.

इ) नियोक्त्याकडून उमेदवारांना नियुक्ती देताना उमेदवारांकडून नियुक्ती स्वीकृतीबाबतचे डिजिटल संमती पत्र (Digital Consent) घेण्यात येईल.

२. गोपनीयता सुरक्षा: उमेदवारांच्या माहितीची गोपनीयता (Privacy) पूर्णपणे सुरक्षित राहील याची दक्षता 'मैत्री' पोर्टलच्या आयटी विंगकडून घेतली जाईल. हा डेटा केवळ 'मैत्री' पोर्टलवर नोंदणीकृत आणि पडताळणी झालेल्या (Verified) अधिकृत खाजगी उद्योजकांना आणि संस्थांनाच तसेच शासकीय/निमशासकीय संस्था/मंडळे / महामंडळे यांना रोजगाराच्या हेतूसाठी पाहता येईल. डेटाची कोणत्याही प्रकारची गळती किंवा व्यावसायिक गैरवापर होणार नाही याची तांत्रिक खबरदारी (Encryption & Access Control) मैत्री पोर्टलद्वारे घेतली जाईल.

## मराठा विद्यार्थ्यांना OBC समान शैक्षणिक सवलती



**मुंबई :** मराठा समाजाच्या आर्थिक आणि शैक्षणिक प्रगतीला चालना देण्यासाठी फडणवीस सरकारने एक अत्यंत महत्त्वपूर्ण आणि ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. या निर्णयानुसार, आता इतर मागासवर्गीय (ओबीसी) प्रवर्गातील विद्यार्थ्यांप्रमाणेच मराठा समाजातील विद्यार्थ्यांनाही शासनाच्या सर्व प्रकारच्या शैक्षणिक सवलती आणि सोयी-सुविधा लागू करण्यात येणार आहेत.

शासनाच्या या नव्या धोरणांतर्गत, ओबीसी प्रवर्गाच्या धर्तीवर मराठा समाजासाठी तब्बल 8 विशेष योजना सुरू करण्यात येणार आहेत. या निर्णयामुळे मराठा समाजातील हजारो होतकरू विद्यार्थ्यांना उच्च आणि व्यावसायिक शिक्षण घेताना मोठा आर्थिक दिलासा मिळणार आहे. विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी लागू करण्यात आलेल्या या महत्त्वपूर्ण 8 योजना नेमक्या कोणत्या आहेत, याची सविस्तर माहिती खालीलप्रमाणे आहे.

मराठा समाजातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रवाहात अधिक सक्षम करण्यासाठी आणि त्यांना उच्च शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी, राज्य शासनाने ओबीसी प्रवर्गाच्या धर्तीवर खालील महत्त्वपूर्ण योजना आणि सवलती लागू केल्या आहेत:

इयत्ता दहावी उत्तीर्ण झाल्यानंतर पुढील उच्च शिक्षणासाठी ओबीसी विद्यार्थ्यांप्रमाणेच आता मराठा समाजातील विद्यार्थ्यांनाही शालांत परीक्षोत्तर शिष्यवृत्ती योजनेचा लाभ मिळणार आहे.

तरुणांना रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने मराठा समाजातील तरुणांसाठी विशेष 'मोटार वाहन चालक आणि वाहक (कंडक्टर) प्रशिक्षण योजना' राबवण्यात येणार आहे.

इयत्ता 9 वी ते 12 वी मध्ये शिकणाऱ्या माध्यमिक आणि उच्च माध्यमिक वर्गातील विद्यार्थ्यांसाठी असलेली विशेष शिष्यवृत्ती योजना आता मराठा प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठीही लागू करण्यात आली आहे.

विद्यार्थ्यांना लागू असलेल्या इतर 16 विविध बाबींच्या शैक्षणिक शुल्काची प्रतिपूर्ती आता शासनाकडून थेट केली जाईल, ज्यामुळे आर्थिक भार कमी होण्यास मदत होईल.

महाराष्ट्राचे रहिवासी असलेले, परंतु परराज्यातील अनुदानित किंवा विनाअनुदानित व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेणाऱ्या मराठा समाजातील उमेदवारांनाही या सवलतींचा फायदा घेता येईल.

ओबीसी विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या सर्व शैक्षणिक सुविधा आता मराठा विद्यार्थ्यांसाठीही खुल्या करण्यात आल्या आहेत. त्यामुळे सर्व मान्यताप्राप्त व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या सवलतींसाठी मराठा विद्यार्थी पूर्णपणे पात्र मानले जातील.

केंद्रीयभूत प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर महाविद्यालयांमधील रिक्त जागांवर किंवा प्रवेश नियंत्रण समितीच्या मान्यतेने संस्था स्तरावर प्रवेश घेणाऱ्या मराठा विद्यार्थ्यांनाही ओबीसी विद्यार्थ्यांप्रमाणेच सर्व शैक्षणिक सवलतींचा लाभ दिला जाणार आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ०६ जून २०२६


## सुदृढ आरोग्य

बालमित्रांनो
मोठ्यांचं ऐका जरा
जेवतांना त्रास देणे
प्रकार नाही बरा

जेवणाआधी धुवा
साबणाने स्वच्छ हात
ताटातील खा मग
भाजी,वरण, भात

जेवणात असू द्या
हिरव्या पालेभाज्या
नेहमी खात जा
ताज्या ताज्या

भाकर आणि पोळी
हा मुख्य आहार
गोड पदार्थ
खाऊ नका फार

काकडी आणि मुळा
घेऊन बसा ताटात
कडधान्याची उसळ
जाऊ द्या पोटात

सुदृढ आरोग्य
आहे तुमच्याच हाती
सकस आहार घेता
आजार दूर जाती




**- रवींद्र चालीकवार**
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.९०११५५९१०६



प्रवेश सुरू

बी.ए. मराठी व उर्दू माध्यम

एम.ए मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दू

बालसंगोपन

डीप्लोमा गांधी विचार

मानवी हक्क प्रमाणपत्र

संपर्क

9405109103


## अवैध प्रवासी वाहतुकीविरोधात एसटीची धडक मोहीम राबवणार ! सुरक्षा व दक्षता अधिकारी काळबांडे




**जिंतूर (बी.डी.रामपूरकर) :** राज्य परिवहन महामंडळाच्या (एसटी) उत्पन्नाला फटका देणाऱ्या अवैध प्रवासी वाहतुकीवर आळा घालण्यासाठी राज्यभर विशेष मोहीम राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या मोहिमेअंतर्गत सर्व प्रमुख बसस्थानकांच्या परिसरात अनधिकृतपणे प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनांवर कडक कारवाई केली जाणार असून, बसस्थानकापासून २०० मीटरपर्यंतचा परिसर 'नो पार्किंग झोन' म्हणून घोषित करण्यात आला आहे. ही मोहीम ५ जून ते १५ जून या कालावधीत राबविण्यात येणार आहे.राज्याचे परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक तसेच एसटी महामंडळाच्या मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी तथा पोलीस उप महानिरीक्षक डॉ. नारनवरे, यांच्या निर्देशानुसार ही कारवाई करण्यात येत आहे. गेल्या काही वर्षांत खासगी वाहनांद्वारे होत असलेल्या अवैध प्रवासी वाहतुकीमुळे एसटी महामंडळाच्या महसुलात मोठी घट झाली आहे. तसेच अशा वाहनांमध्ये प्रवास करणाऱ्या प्रवाशांच्या सुरक्षिततेचाही प्रश्न निर्माण होत असल्याने प्रशासनाने याची गंभीर दखल घेतली आहे.या मोहिमेदरम्यान बसस्थानकांच्या २०० मीटर परिसरात थांबून प्रवासी उचलणाऱ्या किंवा अनधिकृतपणे प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनांवर विशेष लक्ष ठेवले जाणार आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर स्थानिक पोलिसांच्या मदतीने दंडात्मक तसेच कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे. यासाठी राज्यातील सर्व पोलीस आयुक्त, पोलीस अधीक्षक आणि स्थानिक प्रशासनाला सहकार्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.परभणी विभागातील जिंतूर, परभणी, सेलू, पाथरी, मानवत, वसमत, हिंगोली, कळमनुरी आदी प्रमुख बसस्थानकांच्या परिसरातही ही मोहीम प्रभावीपणे राबविण्यात येणार आहे. बसस्थानकाबाहेर प्रवासी गोळा करून वाहतूक करणाऱ्या वाहनांवर विशेष लक्ष ठेवण्यात येणार असून, अशा वाहनांवर तत्काळ कारवाई केली जाणार आहे.परभणी विभागाचे सुरक्षा व दक्षता अधिकारी काळबांडे यांच्या नेतृत्वाखाली ही मोहीम राबविण्यात येणार आहे. विभागातील अधिकारी, पर्यवेक्षक, आगार प्रशासन आणि स्थानिक पोलीस यांचे संयुक्त पथक कारवाई करणार असून, अवैध प्रवासी वाहतुकीवर प्रभावी नियंत्रण मिळविण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.एसटी प्रशासनाने प्रवाशांनाही आवाहन केले असून, अधिकृत एसटी सेवेलाच प्राधान्य द्यावे आणि सुरक्षित प्रवासासाठी अनधिकृत वाहनांचा वापर टाळावा, असे सांगितले आहे. या विशेष मोहिमेमुळे बसस्थानक परिसरातील अवैध प्रवासी वाहतुकीला मोठ्या प्रमाणात आळा बसेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.चौकट - "एसटीचे उत्पन्न वाढविणे, प्रवाशांना सुरक्षित आणि विश्वासार्ह सेवा उपलब्ध करून देणे तसेच अनधिकृत प्रवासी वाहतुकीवर प्रभावी नियंत्रण आणणे हा या मोहिमेचा मुख्य उद्देश आहे. स्थानिक पोलीस व आगार प्रशासनाच्या सहकार्याने नियमभंग करणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई करण्यात येईल- अ.ल.काळबांडे सुरक्षा व दक्षता अधिकारी"

## दौलताबाद रेल्वे स्थानकाजवळ रेल्वेतून पडून युवकाचा मृत्यू

**दौलताबाद (जावेद अहमद) :** माळीवाडा रेल्वे स्थानकाजवळील रेल्वे फाटक क्रमांक ४५ परिसरात एका युवकाचा रेल्वेतून पडून मृत्यू झाल्याची घटना उघडकीस आली. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.मिळालेल्या माहितीनुसार, रात्रीच्या सुमारास एक अनोळखी व्यक्ती रेल्वे फाटक क्रमांक ४५ जवळ बेशुद्ध अवस्थेत आढळून आली. याबाबतची माहिती मिळताच संबंधित यंत्रणांनी घटनास्थळी धाव घेतली. जखमी व्यक्तीस तातडीने उपचारासाठी घाटी रुग्णालयात हलविण्यात आले. मात्र डॉक्टरांनी तपासणी करून त्यास मृत घोषित केले.त्यानंतर सकाळी सुमारे १० वाजता मृत व्यक्तीची ओळख पटली. मृत युवकाचे नाव मोहन किसन गिरी (वय ३२, रा. गोळेगाव, ता. औंढा नागनाथ, जि. हिंगोली) असे आहे.प्राथमिक माहितीनुसार, रेल्वेतून पडल्याने त्याचा मृत्यू झाल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. या प्रकरणी रेल्वे पोलिसांकडून पुढील तपास सुरू असून मृत्यूचे नेमके कारण तपासाअंती स्पष्ट होणार आहे.

## जे.ई.एस महाविद्यालयात पर्यावरण दिन साजरा




**जालना (प्रा डॉ राजेंद्र सोनवणे) :** जे ई एस महाविद्यालय जालना येथे जागतिक पर्यावरण दिन प्राचार्य डॉ.गणेश अग्निहोत्री यांच्या हस्ते वृक्ष लागवड करून साजरा करण्यात आला. यावेळी जालना जिल्हा परिषदेचे माध्यमिक उपशिक्षण अधिकारी श्री काझी यांच्या हस्ते ही वृक्षाची लागवड करण्यात आली. या कार्यक्रमास उपप्राचार्य प्रा. प्रवीण बाफना, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ.राजेंद्र सोनवणे, प्रा. किशोर तापडिया ,वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. उमेश मोगले ग्रंथालय विभाग प्रमुख डॉ. मनीषा सुतार, प्रा समाधान पवार तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी श्री. अर्जुन सोनटक्के श्री धर्मेश आंबट, बबन जोशी आदिनी विशेष प्रयत्न केलेत.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ०६ जून २०२६


## पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांचे विचार सर्वसामान्यांत रुजवा - प्रा. विशाल गरड




**मुरूम : (प्रा.सुधीर पंचगल्ले)** मुरूममध्ये अहिल्यादेवी जयंतीनिमित्त लोकव्याख्यान; विचार जागृतीचा संदेशमुरूम, ता. ४ (प्रतिनिधी) : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त आयोजित लोकव्याख्यानात बोलताना प्रा. विशाल गरड यांनी अहिल्याबाई होळकर यांचे लोककल्याणकारी कार्य, न्यायप्रिय राज्यकारभार आणि समाजहिताचा विचार सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्याची गरज असल्याचे प्रतिपादन केले.पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या वतीने बुधवार (ता. ३) रोजी अशोक चौक, मुरूम येथे आयोजित कार्यक्रमात ते प्रमुख व्याख्याते म्हणून बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नगरसेवक राजेंद्र बेंडकाळे होते.यावेळी शहर भाजप उपाध्यक्ष राजू मुल्ला, नगरसेविका सुनिता बन्ने, प्रदीप बिराजदार, पत्रकार अजिंक्य मुरूमकर, विलास वाडीकर यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. पुढे बोलताना प्रा. गरड म्हणाले, अहिल्याबाई होळकर यांच्या जीवनकार्याचा सविस्तर आढावा घेताना जनकल्याणाची कामे, धार्मिक व सामाजिक समतेचा संदेश, न्यायनिष्ठ प्रशासन आणि विकासाभिमुख दृष्टीकोन यामुळे त्या आजही आदर्श शासक म्हणून ओळखल्या जातात. समाजातील प्रत्येक घटकाच्या उन्नतीसाठी कार्य करणाऱ्या अहिल्यादेवींच्या विचारांचे अनुकरण करून समाजहिताची भावना जोपासण्याचे आवाहन त्यांनी उपस्थितांना केले.पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष बिरू ढंगापुरे, उपाध्यक्ष मारुती बन्ने, सचिव राहुल बन्ने यांच्या नेतृत्वाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. समितीचे मार्गदर्शक दिगंबर सोनटक्के, विजय घोडके यांनी कार्यक्रमाच्या नियोजनासाठी विशेष मार्गदर्शन केले. म्हाळू ढंगापुरे, दयापुरे, सचिन ढंगापुरे, संदीप ढंगापुरे, शांतू बन्ने, सागर कांबळे, रतन बन्ने, राजू दुधभाते, गंगाधर दुधभाते, रामदास बन्ने, बंडू बन्ने, सचिन गाडेकर, आकाश गाडेकर, दीपक सोनटक्के, सुचिन सुरवसे, राम चेंडके व बरगली चेंडके आदींनी विशेष परिश्रम घेतले. या प्रसंगी उपस्थितांनी प्रा. विशाल गरड यांच्या अभ्यासपूर्ण व प्रेरणादायी व्याख्यानाचे कौतुक केले. अहिल्याबाई होळकर यांच्या विचारांचा प्रसार समाजात व्यापक प्रमाणात व्हावा आणि नव्या पिढीला त्यांच्या कार्यातून प्रेरणा मिळावी, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली.या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन व आभार प्रवीण राठोड यांनी केले.

## मुख्याध्यापकाची गळफास घेऊन आत्महत्या



**दौलताबाद (जावेद अहमद) :** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा दौलताबाद चे मुख्याध्यापकानीं गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना गुरुवारी दुपारी दोन वाजता उघडकीस आली नितिन मोहन कांबळे वय ४२ वर्षे राहणार माजी सैनिक. कॉलनी पडेगाव ता.जी,छत्रपती संभाजी नगर असे नाव आहे पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार नितीन कांबळे हे नित्याप्रमाणे ऑटो रिक्षामध्ये बसून अकरा वाजता दौलताबाद येथील जिल्हा परिषद शाळेत आले व ऑटो रिक्षा चालकाला दोन वाजता येण्याचे सांगितले जेव्हा ऑटो रिक्षा चालक संदीप धायडे हे शाळेत आले असता शाळेच्या कार्यालयामध्ये नितीन यांनी छतावर असलेल्या पंख्याला गळयातील रुमालाच्या साह्याने लटकलेले दिसले त्यांनी सदर माहिती दौलताबाद पोलीस स्टेशनला दिली माहिती मिळतात. पोलीस उपनिरीक्षक संदीप वाघ,अशोक सोनवणे, अयुब पठाण पोलिस अमलदार मनोज राठोड,सुदर्शन राजपूत यांनी घटनास्थळी धाव घेऊन ग्रामस्थांच्या मदतीने दौलताबाद पोलीस स्टेशन येथील टू मोबाईल मध्ये टाकून छत्रपती संभाजीनगर येथील शासकीय घाटी रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी तपासून मदत घोषित केले. सदर घटनेचे दौलताबाद पोलीस स्टेशनमध्ये नोंद घेण्यात आली आहे. नितीन कांबळे यांनी आत्महत्या का केली याचे स्पष्ट झाले नाही

## जिंतूर शहर भाजपातर्फे क्रीडा संकुलात १०१ वृक्षांचे रोपण



**जिंतूर, (बी. डी. रामपूरकर) :** जागतिक पर्यावरण दिनानिमित्त राज्याच्या राज्यमंत्री तथा परभणी जिल्ह्याच्या पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी केलेल्या वृक्षारोपणाच्या आवाहनाला प्रतिसाद देत भारतीय जनता पक्षाच्या जिंतूर शहर मंडळाच्या वतीने क्रीडा संकुल परिसरात १०१ वृक्षांचे वृक्षारोपण करण्यात आले.पर्यावरण संवर्धन, हरित परिसर निर्मिती आणि भावी पिढ्यांसाठी स्वच्छ वातावरण उपलब्ध व्हावे या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमात कार्यकर्ते, पदाधिकारी व नागरिकांनी उत्साहाने सहभाग नोंदविला. वृक्षारोपणानंतर लावलेल्या रोपांचे संगोपन करण्याचा निर्धारही उपस्थितांनी व्यक्त केला.यावेळी नगराध्यक्ष प्रताप देशमुख, गटनेते सचिन गोरे, उपाध्यक्ष मोहसीन खान, नगरसेवक किशोर जाधव व असेफ खान, मंडळाध्यक्ष विलास भंडारे, उपक्रमाचे संयोजक समीर जानीमियाँ, किसान मोर्चा मंडळाध्यक्ष सचिन रायपत्रीवार, बंटी जाधव, विजय जाधव, राजेश राठोड, शाहरुख सर, ताठे, सय्यद नसीर, रमेश संगेकर, अनिल मेटागळे, जोशी सर तसेच विद्यार्थी व भाजपाचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी उपस्थित मान्यवरांनी पर्यावरण संरक्षणासाठी प्रत्येक नागरिकाने किमान एक झाड लावून त्याचे संगोपन करावे, असे आवाहन केले. शहरातील हरित क्षेत्र वाढविण्यासाठी अशा उपक्रमांची सातत्याने अंमलबजावणी केली जाणार असल्याचेही पदाधिकाऱ्यांनी सांगितले.छायाचित्र ओळ : जिंतूर येथील क्रीडा संकुल परिसरात भाजप शहर मंडळाच्या वतीने आयोजित वृक्षारोपण उपक्रमात सहभागी झालेले पदाधिकारी व कार्यकर्ते.


प्रवेश सुरू

डी.एम.एल.टी.

P.G.DMLT

फिजोओथेरिपी

डिप्लोमा ऑप्थोमेट्री

OT टेक्नीशियन

X-Ray, ECG

रेडीओलॉजी

संपर्क

9405109103


## जोडू निसर्गाशी नाते

धोका ओळखून आता,
जोडू निसर्गाशी नाते.
आनंदाने एक झाड,
माणसांचे गीत गाते. १

झाड निस्वार्थी होऊन,
सदा सावली ती देते.
आनंदाने डोलतांना,
मदतीस सदा येते. २

थकलेल्या माणसांना,
सावलीत हाक देते.
हाक देऊन सदैव,
माणसांची भेट घेते. ३

ओळखून धोका आता,
एक एक झाड लावा.
निसर्गाच्या रक्षणाला,
चला सारेजण धावा. ४

निसर्गाच्या रक्षणार्थ,
सारेजण झाडं लाऊ.
निसर्गाच्या सानिध्यात,
निसर्गाचे गीत गाऊ. ५



**- नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**

महाराष्ट्र जनशक्ती


website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ०६ जून २०२६

# शिवराज्याभिषेक : स्वराज्याच्या सार्वभौमतेचा सुवर्णक्षण - डॉ. राजेंद्र बगाटे



रतीय इतिहासात काही घटना अशा आहेत की ज्यांचे महत्त्व केवळ त्या काळापुरते मर्यादित राहत नाही, तर त्या पुढील अनेक पिढ्यांना प्रेरणा देत राहतात. अशा घटनांपैकी एक अत्यंत महत्त्वाची आणि गौरवशाली घटना म्हणजे छत्रपती छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक होय. ६ जून १६७४ रोजी रायगडाच्या पवित्र भूमीवर संपन्न झालेला हा सोहळा केवळ एका राजाच्या सिंहासनारोहणाचा कार्यक्रम नव्हता, तर तो हिंदवी स्वराज्याच्या सार्वभौमतेची जगासमोर झालेली अधिकृत घोषणा होती. या ऐतिहासिक प्रसंगाने महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक इतिहासाला नवे वळण दिले. अनेक शतकांपासून परकीय सत्तांच्या अधिपत्याखाली असलेल्या जनतेच्या मनात स्वाभिमान, आत्मविश्वास आणि स्वातंत्र्याची ज्योत प्रज्वलित करणारा हा क्षण होता. म्हणूनच ६ जून हा दिवस महाराष्ट्रासाठी आणि संपूर्ण भारतासाठी अभिमानाचा, प्रेरणेचा आणि राष्ट्रभक्तीचा दिवस मानला जातो.सतराव्या शतकातील भारताचा इतिहास पाहिला तर देशाची राजकीय परिस्थिती अत्यंत गुंतागुंतीची होती. दिल्लीतील मुघल सत्ता विस्ताराच्या शिखरावर होती. दक्षिणेत आदिलशाही, निजामशाही, कुतुबशाही यांसारख्या विविध सत्तांचे वर्चस्व होते. सामान्य जनता करांचा बोजा, अन्याय, अत्याचार आणि असुरक्षिततेच्या वातावरणात जीवन जगत होती. समाजामध्ये निराशा आणि परावलंबित्वाची भावना वाढीस लागली होती. अशा वेळी महाराष्ट्राच्या मातीत एक असे व्यक्तिमत्त्व उदयास आले ज्याने स्वराज्याचे स्वप्न पाहिले आणि ते प्रत्यक्षात साकार करून दाखविले. १९ फेब्रुवारी १६३० रोजी शिवनेरी किल्ल्यावर जन्मलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांना माता जिजाऊंनी रामायण, महाभारत आणि भारतीय संस्कृतीतील आदर्शांचे संस्कार दिले. अन्यायाविरुद्ध लढण्याची आणि दुर्बलांचे रक्षण करण्याची प्रेरणा बालपणापासूनच त्यांच्या मनात रुजली.छत्रपती शिवाजी महाराजांनी अत्यंत लहान वयात स्वराज्य उभारणीचा संकल्प केला. त्या काळात स्वतंत्र राज्य निर्माण करणे ही अत्यंत कठीण गोष्ट होती. परंतु दृढनिश्चय, धाडस आणि जनतेवरील विश्वास यांच्या बळावर त्यांनी स्वराज्याचा पाया रचला. तोरणा किल्ला जिंकून त्यांनी स्वराज्याच्या स्थापनेची पहिली पायरी गाठली. त्यानंतर राजगड, पुरंदर, कोंढाणा, प्रतापगड, जावळी यांसारख्या अनेक प्रदेशांवर स्वराज्याचा झेंडा फडकला. अफजलखानाचा वध, शाहिस्तेखानावरील धाडसी हल्ला, सुरतेवरील मोहीम आणि आग्र्याहून केलेली थरारक सुटका या घटनांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाची कीर्ती संपूर्ण भारतभर पसरली. त्यांनी केवळ युद्धे जिंकली नाहीत, तर लोकांच्या मनात स्वराज्याची भावना निर्माण केली.छत्रपती शिवाजी महाराजांनी उभारलेले स्वराज्य प्रत्यक्षात स्वतंत्र होते. तथापि, त्या काळातील राजकीय आणि सामाजिक व्यवस्थेनुसार राज्यकर्त्याला सार्वभौम शासक म्हणून अधिकृत मान्यता मिळण्यासाठी राज्याभिषेक आवश्यक मानला जात असे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या विरोधकांकडून त्यांच्या क्षत्रियत्वाबाबत प्रश्न उपस्थित केले जात होते. तसेच स्वराज्याला स्वतंत्र राजकीय अस्तित्व प्राप्त झाले असले तरी त्याला अधिकृत स्वरूप देणे गरजेचे होते. त्यामुळे राज्याभिषेकाचा निर्णय घेण्यात आला. हा निर्णय केवळ धार्मिक नव्हता, तर तो राजकीय दृष्ट्याही अत्यंत महत्त्वाचा होता. राज्याभिषेकामुळे स्वराज्य हे कोणत्याही सुलतानाच्या किंवा बादशहाच्या अधिपत्याखाली नसून स्वतंत्र आणि सार्वभौम राज्य असल्याचे जगाला जाहीर होणार होते. राज्याभिषेकाच्या तयारीसाठी मोठ्या प्रमाणावर नियोजन करण्यात आले. रायगड किल्ला सजविण्यात आला. संपूर्ण स्वराज्यात आनंदाचे वातावरण निर्माण झाले. देशभरातील विद्वान, संत, पंडित, सरदार आणि मान्यवरांना निमंत्रित करण्यात आले. काशीचे प्रसिद्ध वेदपंडित गागाभट्ट यांना राज्याभिषेक विधीचे प्रमुख म्हणून आमंत्रित करण्यात आले. त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या वंशावळीचा अभ्यास करून त्यांना क्षत्रिय असल्याचे प्रमाणित केले. त्यामुळे राज्याभिषेकास धार्मिक आणि सामाजिक मान्यता प्राप्त झाली.राज्याभिषेकासाठी अनेक दिवस यज्ञ, हवन, पूजा आणि धार्मिक विधी सुरू होते. रायगडावर हजारो लोक जमले होते. प्रत्येकाच्या मनात उत्सुकता आणि अभिमानाची भावना होती. अनेक वर्षांच्या संघर्षानंतर स्वराज्याला अधिकृत स्वरूप प्राप्त होणार होते.६ जून १६७४ रोजी पहाटे राज्याभिषेकाचा मुख्य सोहळा पार पडला. त्यानंतर सुवर्णसिंहासनावर त्यांना विराजमान करण्यात आले. त्या क्षणी रायगडाच्या भूमीवर इतिहास घडत होता. अनेक शतकांनंतर भारतीय भूमीवर एका स्वतंत्र हिंदवी राज्याच्या सार्वभौम राजाचा राज्याभिषेक होत होता. हा क्षण महाराष्ट्राच्या इतिहासातील सर्वांत अभिमानास्पद क्षणांपैकी एक मानला जातो.राज्याभिषेकामुळे छत्रपती शिवाजी महाराजांना धार्मिक, सामाजिक आणि राजकीय मान्यता मिळाली. त्यांच्या सत्तेला वैधानिक स्वरूप प्राप्त झाले. स्वराज्याचा स्वतंत्र शासक म्हणून त्यांची ओळख निर्माण झाली. याच वेळी स्वतंत्र राजमुद्रा स्वीकारण्यात आली. राजमुद्रेवरील श्लोक स्वराज्याच्या तत्त्वज्ञानाचे प्रतीक होता. प्रतिपदेच्या चंद्रकोरीप्रमाणे वाढणारे आणि लोककल्याणासाठी कार्य करणारे राज्य ही त्यामागील संकल्पना होती.राज्याभिषेकानंतर छत्रपती शिवाजी महाराजांनी प्रशासन अधिक मजबूत केले. अष्टप्रधान मंडळाची रचना अधिक प्रभावीपणे कार्यरत झाली. पेशवा, अमात्य, सचिव, मंत्री, सुमंत, सेनापती, न्यायाधीश आणि पंडितराव या आठ प्रमुख पदांमार्फत राज्यकारभार चालविला जात होता. प्रत्येक विभागाची स्पष्ट जबाबदारी निश्चित करण्यात आली होती. शासनातील पारदर्शकता, कार्यक्षमता आणि उत्तरदायित्व यांना प्राधान्य देण्यात आले. त्यामुळे स्वराज्याची प्रशासनव्यवस्था त्या काळातील इतर राज्यांच्या तुलनेत अधिक प्रभावी ठरली.छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्यकारभार लोककल्याणकारी होता. त्यांनी शेतकऱ्यांच्या हिताचे रक्षण केले. जमिनीचे मोजमाप करून न्याय्य महसूल पद्धती लागू केली. शेतकऱ्यांवर अतिरिक्त करांचा भार टाकला गेला नाही. दुष्काळ किंवा संकटाच्या काळात त्यांना मदत पुरविण्यात आली. त्यामुळे स्वराज्यातील कृषीव्यवस्था मजबूत झाली. जनतेच्या कल्याणासाठी शासन असावे, ही त्यांची भूमिका होती. म्हणूनच छत्रपती शिवाजी महाराजांना "रयतेचा राजा" असे संबोधले जाते.स्त्रियांच्या सन्मानाचे रक्षण हे छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्यकारभाराचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य होते. युद्धात शत्रूपक्षातील स्त्रियांनाही सन्मानाने वागणूक दिली जात असे. महिलांवर अत्याचार करणाऱ्यांना कठोर शिक्षा दिली जात होती. त्या काळात स्त्रियांच्या सुरक्षेला विशेष महत्त्व देणारा असा दृष्टिकोन अत्यंत दुर्मीळ होता. त्यामुळे छत्रपती शिवाजी महाराजांचा स्त्रीविषयक दृष्टिकोन आधुनिक आणि प्रगत मानला जातो.धार्मिक सहिष्णुता हे छत्रपती शिवाजी महाराजांच्या व्यक्तिमत्त्वाचे आणखी एक वैशिष्ट्य होते. त्यांनी कोणत्याही धर्माचा द्वेष केला नाही. त्यांच्या सैन्यात आणि प्रशासनात विविध धर्मांचे लोक कार्यरत होते. मशिदी, दर्गे आणि मुस्लिम धर्मीयांच्या धार्मिक स्थळांचे संरक्षण करण्यात आले. त्यांचा संघर्ष कोणत्याही धर्माविरुद्ध नव्हता, तर अन्यायकारक आणि अत्याचारी सत्तेविरुद्ध होता. त्यामुळे स्वराज्य हे सर्वधर्मसमभाव आणि न्याय यांवर आधारित होते.छत्रपती शिवाजी महाराजांनी संरक्षणव्यवस्थेतही अनेक महत्त्वपूर्ण सुधारणा केल्या. त्यांनी किल्ल्यांचे सशक्त जाळे उभारले. प्रत्येक किल्ल्याचे सामरिक महत्त्व लक्षात घेऊन त्यांचा विकास केला. गनिमी कावा ही युद्धपद्धती प्रभावीपणे वापरून त्यांनी बलाढ्य शत्रूंना पराभूत केले. त्यांचे सैन्य शिस्तबद्ध, प्रशिक्षित आणि निष्ठावान होते. याशिवाय त्यांनी सागरी सुरक्षेलाही विशेष महत्त्व दिले. सिंधुदुर्ग, विजयदुर्ग आणि सुवर्णदुर्ग यांसारखे जलदुर्ग बांधून त्यांनी आरमाराची उभारणी केली. भारतीय इतिहासात सशक्त नौदल निर्माण करणाऱ्या शासकांमध्ये त्यांचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते.राज्याभिषेकामुळे स्वराज्याला नवीन ऊर्जा प्राप्त झाली. मराठा साम्राज्याच्या विस्ताराला गती मिळाली. पुढील काळात मराठा सत्ता महाराष्ट्राबाहेरही विस्तारली. स्वराज्याची संकल्पना संपूर्ण भारतात पोहोचली. अनेकांना अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची प्रेरणा मिळाली. त्यामुळे शिवराज्याभिषेक हा केवळ महाराष्ट्राच्या इतिहासातील नव्हे, तर भारतीय राष्ट्रचेतनेच्या इतिहासातीलही एक महत्त्वाचा टप्पा मानला जातो.छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाचा सांस्कृतिक प्रभावही मोठा होता. मराठी भाषा, साहित्य, कला आणि संस्कृतीला नवसंजीवनी मिळाली. प्रशासनात मराठी भाषेचा वापर वाढला. स्थानिक परंपरा आणि सांस्कृतिक मूल्यांना प्रोत्साहन मिळाले. स्वराज्याच्या स्थापनेमुळे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक अस्मितेला नवे बळ प्राप्त झाले. आजही महाराष्ट्रातील लोकजीवनात छत्रपती शिवाजी महाराजांचे स्थान अत्यंत आदराचे आहे.आधुनिक काळात शिवराज्याभिषेक दिनाचे महत्त्व अधिक व्यापक झाले आहे. आज भारत एक लोकशाही राष्ट्र आहे. लोकशाहीतील अनेक मूल्ये जसे की सुशासन, लोककल्याण, न्याय, समानता आणि उत्तरदायित्व यांची झलक छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्यात दिसून येते. त्यांनी दाखविलेला आदर्श आजच्या प्रशासकांसाठी, राजकारण्यांसाठी आणि समाजनेत्यांसाठी मार्गदर्शक ठरू शकतो. भ्रष्टाचारमुक्त प्रशासन, स्त्रियांचा सन्मान, सामाजिक समता आणि राष्ट्रीय एकात्मता यांसारख्या मूल्यांची आजही समाजाला गरज आहे.दरवर्षी ६ जून रोजी महाराष्ट्रासह देशभरात शिवराज्याभिषेक दिन उत्साहात साजरा केला जातो. रायगडावर विशेष सोहळ्यांचे आयोजन केले जाते. हजारो शिवभक्त, इतिहासप्रेमी आणि पर्यटक रायगडावर जाऊन महाराजांना अभिवादन करतात. विविध ठिकाणी व्याख्याने, प्रदर्शन, पोवाडे, सांस्कृतिक कार्यक्रम आणि ऐतिहासिक मिरवणुका आयोजित केल्या जातात. या माध्यमातून नव्या पिढीपर्यंत शिवचरित्र पोहोचविण्याचे कार्य केले जाते.आजच्या युवकांसाठी शिवराज्याभिषेक दिन विशेष प्रेरणादायी आहे. नेतृत्व, संघटनकौशल्य, धैर्य, दूरदृष्टी, प्रामाणिकपणा आणि राष्ट्रनिष्ठा या गुणांचे महत्त्व छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनातून शिकता येते. त्यांनी प्रतिकूल परिस्थितीतही हार मानली नाही. संकटांना संधीमध्ये बदलून त्यांनी स्वराज्याची उभारणी केली. हीच प्रेरणा आजच्या तरुणांना जीवनातील आव्हानांचा सामना करण्यासाठी उपयोगी ठरू शकते.छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्य केवळ ऐतिहासिक गौरवापुरते मर्यादित नाही. त्यांच्या विचारांमध्ये आधुनिक समाजासाठीही मार्गदर्शन आहे. समाजातील दुर्बल घटकांचे संरक्षण, स्त्रियांचा सन्मान, पर्यावरणाबाबत जागरूकता, न्यायनिष्ठ प्रशासन आणि राष्ट्रहिताला सर्वोच्च प्राधान्य देणे ही त्यांची शिकवण आजही तितकीच उपयुक्त आहे. म्हणूनच छत्रपती शिवाजी महाराजांना केवळ इतिहासातील महान राजा म्हणून नव्हे, तर एक आदर्श राष्ट्रपुरुष म्हणून स्मरण केले जाते.छत्रपती छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक हा भारतीय इतिहासातील स्वाभिमान, स्वातंत्र्य आणि लोककल्याण यांचा विजय होता. रायगडावरील त्या सुवर्णक्षणाने महाराष्ट्राला सार्वभौम नेतृत्व दिले, जनतेला आत्मविश्वास दिला आणि भारतीय इतिहासाला नवी दिशा दिली. ६ जून हा दिवस आपल्याला केवळ भूतकाळातील वैभवाची आठवण करून देत नाही, तर वर्तमान आणि भविष्य घडविण्यासाठी आवश्यक असलेल्या मूल्यांची जाणीवही करून देतो.शिवराज्याभिषेक दिनानिमित्त आपण छत्रपती छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याला, त्यांच्या अद्वितीय नेतृत्वाला आणि स्वराज्याच्या महान संकल्पनेला अभिवादन करतो. स्वाभिमान, न्याय, लोककल्याण, राष्ट्रप्रेम आणि सर्वधर्मसमभाव या मूल्यांचे जतन करूनच आपण त्यांच्या कार्याचा खरा वारसा पुढे नेऊ शकतो. रायगडावर झालेला राज्याभिषेक हा इतिहासातील एक प्रसंग असला, तरी त्यातून मिळणारी प्रेरणा चिरंतन आहे. जोपर्यंत स्वराज्य, स्वातंत्र्य आणि न्याय या मूल्यांवर मानवाचा विश्वास राहील, तोपर्यंत छत्रपती छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक आणि त्यांचा तेजस्वी वारसा भारतीय जनमानसात अजरामर राहील.



**डॉ. राजेंद्र बगाटे**
**(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत),**
**bagate.rajendra5@gmail.com**